## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०१८ मधील निशाणी क्र. ३२ वरिल आदेश</u>

(अक्षय गावडे वि. प्रेमल वसंत वाघ)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस फैलावर घेण्यास उशीर माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ प्रेमल वसंत वाघ या दिनांक २७/०८/२०२२ रोजी मयत झाल्या. सबब वादीस प्रतिवादी नं. १ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणेस सुमारे ८ महिन्यांचा उशीर झालेला आहे. प्रतिवादी नं. १ यांचे पुणे येथे निधन झाल्याने वादीस सदरची माहिती होण्यास उशीर झाला. दावा प्रतिवादी नं. १ विरूध्द एकतर्फा होता म्हणून वादीस प्रतिवादी नं. १ यांच्या निधनाची माहिती वेळेत मिळू शकली नाही. त्यामुळे प्रतिवादी नं. १ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झाला. सबब विलंब माफ करण्यात यावा.

**०२.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा ०५ वर्षे जुना आहे. दावा हा निरंतर ताकीद व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ३३ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. १ या दिनांक २७.०८.२०२२ रोजी मयत झाल्याचे वादीने कथन केलेले आहे. मुदतीच्या कायदान्वये ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. वादीचा अर्ज दिनांक १०.०८.२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस निश्चितच विलंब झालेला आहे. तथापि न्यायाच्या दृष्टीने दाव्यामधील आवश्यक पक्षकार त्यांचे वारस आणि त्यांचे म्हणणे पुरावे दाव्याकामी समाविष्ट करून घेणे हे दाव्याचा गुणदोषावर अंतीम निकाल होण्याकामी आवश्यक आहे. दाव्यामध्ये मिळकतीबाबत असलेला कायदेशीर हक्क अधिकार याबाबतचे प्रश्न महत्वपुर्ण आहेत. सबब वारस दाव्याकामी समाविष्ट करण्याकरीता विलंब माफ करणे आणि त्यांना दावा चालवणे कामी संधी देणे योग्य होणार आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी ३२ खर्च रक्कम रूपये १००/— भरण्याच्या अटीवर मंजुर करून प्रतिवादी क्र. १ यांचे वारस फैलावर घेण्यास झालेला आठ महिन्यांचा विलंब माफ करण्यात येतो.

२. खर्च रक्कम रूपये १००/— सरकार जमा करण्याचा आदेश पारीत.

दिनांक: १०.०८.२०२३

**(एम. ए. के. शेख)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव